# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - ५

## (सभावृत्तांत)

दिनांक – १९/०४/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार,दिनांक १९/०४/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ठंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.मुंढे उषा अंकुश
६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
८) मा.कुटे निर्मला संजय
९) मा.कोमल दिपक मेवानी
१०) मा.आशा धायगुडे-शेंडगे
११) मा.गोफणे अनुराधा देविदास
१२) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१३) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१४) मा.राजू मिसाळ
१५) मा.अमित राजेंद्र गावडे
१६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.लांडे-मुख्यलेखापाल,मा.गावडे–सहआयुक्त,मा.पाटील,मा.तुपे,मा.दुधेकर–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर,मा.दुरगुडे,मा.इंदलकर,मा.लोणकर,मा.बोदडे-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार,मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ),मा.निकम,मा.सवणे,मा.तांबे,मा.चव्हाण,मा.थोरात,मा.कुलकर्णी,मा.खाबडे, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.गलबले,मा.घोडे,मा.कांबळे,मा.पुजारी,मा.भोसले,मा.मोरे,मा.घुबे,मा.रत्नपारखी -कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी,मा.राजेश जाधव (पास विभाग प्रमुख, पीएमपीएमएल), मा.ऐवले- समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मे.Crisil Risk and Infrastructure Solution Limited यांचेकडून पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्मार्ट सिटी प्रकल्पाकरीता Smart City Proposal तयार करणेत आले आहे. सभेत त्याचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी सन्मा.सदस्या वैशाली काळभोर यांनी प्रश्न उपस्थित केला की, आत्ता जे सादरीकरण करण्यात आले आहे, त्यामध्ये पिंपळे सौदागर, वाकड या भागाचा लेआऊट दाखविला आहे. परंतू हा परिसर विकसित आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेतील जो भाग विकसित होणार आहे, तसेच जी गावे समाविष्ट झाली आहेत, अश्या विकसित नसलेल्या भागाकरीता आपण सदर प्रकल्पामधून काय करु शकता?

यावर मे.क्रिसिल यांचे उपस्थित प्रतिनिधी यांनी उत्तर दिले की, मिशन गाईडलाईनमधून सिटिझन वोटींग मधून जो एरिया निवडला गेला, तो एरिया आम्ही इथे घेतला आहे. या एरियातून रोड,उद्यान,पार्किंग इ. चे गाईडलाईन्स बनवून त्याचा एक सेटअप तयार केला जाईल. हा सेटअप विकसित होत असलेल्या/विकसित भागाकरीता वापरला जाईल. पायलेट प्रोजेक्ट मिशन गाईडलाईनच्या हिशोबाने केला आहे. पॅन सिटी सोल्यूशन आणि डिजिटल सिटी सोल्यूशन यात ५०/५० टक्के असे बजेट घेतलेले आहे.

-------

१) दिनांक ३१/०३/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

२) दिनांक ०५/०४/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------

ठराव क्रमांक – २१२ विषय क्रमांक – १
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – उदयान
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/५८/२०१७ दि.१४/३/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.32/2016-17 करीता मनपाचे निगडी स्मशानभूमी उदयानामध्ये तैवान लॉन लावून मिळणेकामी मे.भैरवनाथ स्वं.से.सह.सं.मर्या. यांचे कोटेशन नोटीस र.रू.1,86,967/- (अक्षरी र.रू.एक लाख शहाऐंशी हजार नउशे सदूसष्ठ फक्त) -21.34% ने कमी कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश, उदयान/6/कावि/57/2017 दि.8/03/2017 अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२१३ विषय क्रमांक – २
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/६१/२०१७ दि.१५/३/२०१७
विषय - सेक्टर क्र. 10 व से.क्र.12 टाकी वरून पाणीपुरवठा होणा-या भागात वितरण नलिका

टाकणे व इतर अनुषंगीक कामे करणेबाबत...

विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय**-जोपर्यंत सदर विषयाबाबत शहानिशा होत नाही, तोपर्यंत विषय मंजूर करता येणार नाही. सदर विषय तहकूब करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२१४ विषय क्रमांक – ३

दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०८/कावि/१६५/२०१७ दि.१४/३/२०१७

विषय - महापालिका सार्वत्रिक निवडणूक–2017 करीता व्हिडीयो चित्रीकरण करणेबाबत...

विषय क्रमांक ३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय-**पुढील दि.२६/०४/२०१७ चे सभेपर्यंत रकमेसहीत फेरप्रस्ताव सादर करावा. तोपर्यंत विषय पुढील सभेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २१५ विषय क्रमांक – ४

दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –स्थापत्य बीआरटीएस

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बीआरटीएस/१०११/२०१७ दि.१५/३/२०१७

विषय - जुना हॅरीस ब्रिजचे Structural Audit करणेबाबत...

**निर्णय-** मे.सी.व्ही.कांड कन्स.प्रा.लि. यांनी महापालिकेचे सगळे प्रोजेक्ट केले आहेत. त्यांना पुढील आठवड्यात बोलवावे. तोपर्यंत विषय तहकूब करणेत येत आहे.

विषय क्रमांक ४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २१६ विषय क्रमांक – ५

दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – औ.प्र.संस्था(मुलींची)कासारवाडी

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.औप्रसं(मु.)/१/कावि/१०७/२०१७ दि.२१/३/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) कासारवाडी येथे प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देणेकरिता प्रस्तावात नमूद केलेल्या अ.क्र.०१ ते ०५ कर्मचा-यांनी नियमित वेतन श्रेणीत नेमणूक मिळणेकामी मे.उच्च न्यायालय येथे म.न.पा. विरूध्द दावा क्र. ११६५१/२०१६ दाखल केलेला आहे. प्रस्तावात नमूद अनु.क्र.०१ ते ०५ मानधन निदेशकांना मे.उच्च न्यायालय येथे म.न.पा. विरूध्द दाखल दावा क्र.११६५१/२०१६ नुसार मे.उच्च न्यायालय यांचे अंतरीम आदेशास अधीन राहून व मा.कायदा सल्लागार यांच्या अभिप्रायानुसार दि.१८/१०/२०१६ रोजी एक दिवस सेवाखंड देवून दिनांक १९/१०/२०१६ ते १८/०४/२०१७ पर्यंत सहा महिने कालावधीकरीता दरमहा

र.रू.२०,०००/- (अक्षरी र.रू.वीस हजार फक्त) मानधनावर हंगामी तात्पुरत्या स्वरूपाची नेमणूक देणेस मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय-** मा.पाटील साहेब (प्राचार्य,औ.प्र.संस्था),या कर्मचा-यांचा पगार देण्यापोटी आमची काही मनाई नाही. विषय असा आहे, या निमित्ताने तुम्ही किती एफर्टलेस आहात, तुम्ही एफर्टस् घेत नाहीत, हे सभागृहापुढे आणायचे होते. मा.आयुक्त साहेब, आम्हाला लोकांच्या पोटावर पाय द्यायचा नाही. डोईफोडे साहेब, स्थायी समितीचे प्रशासनाला आदेश आहेत की, पाटील साहेबांची एकूण वर्तणूक, कामकाजाची पद्धत आम्ही पाहिली. यावर एकही सदस्य समाधानी नाही. यामध्ये सदस्यांचा कुठलाही वाईट हेतू नाही. आम्हाला वाटते, महापालिकेच्या मानांकनात भर पाडणारे आयटीआय आहे. आम्ही मानाने बाहेर सांगतो की, आम्ही आयटीआयसुद्धा चालवतो. तुमची विद्यार्थी संख्या इतकी रोडावली आहे. माध्यमिक शाळांमध्ये सेमिनार कधी झाला पाहिजे. दिवाळीत तिथे सेमिनार झाले पाहिजेत. आपली तीन/चार नाट्यगृहे आहेत. पालकांसहीत विद्यार्थ्यांना बोलवून आपुलकी निर्माण केलीत तर मला वाटते, तुमची स्ट्रेन्थ भरून काढायला, तुम्ही पेपरमध्ये जी जाहिरात देता ती द्यायची पण गरज पडणार नाही. त्याचबरोबर आपल्याकडे एम्प्लॉयमेंट एक्सचेंज आहे, त्यांच्याबरोबर तुमचा काय संपर्क आहे. प्रायव्हेट कॉलेज त्यांचे हजारो विद्यार्थ्यांचे मेळावे घेतात. आपण यासंदर्भात काय करतो. तुम्हाला स्थायी समितीचे स्पष्ट आदेश आहेत की, तुमचा कारभार सुधारा. पुढील वेळी येताना तुमचा कारभार सुधारलेला नसेलतर तुमच्यावर कडक कारवाई करायचा आदेश स्थायी समिती देत आहे. हा विषय पगाराचा विषय असल्यामुळे मंजूर करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२१७ विषय क्रमांक – ६

दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/६३/२०१७ दि.२३/३/२०१७

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील एकूण ४१ स्मशानभूमी/दफनभूमी चे ठिकाणी स्वच्छता व सुरक्षा ठेवणेसाठी काळजीवाहक नेमणेबाबत...

विषय क्रमांक ६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय**- मा.दंडवते साहेब (सहा.आयुक्त), यांना या सभेमध्ये ईएसआय/पीएफसंदर्भात माहिती देण्याबाबत सांगितले होते. परंतू त्यांनी ही माहिती सभागृहाला दिलेली नाही. सक्त ताकीद देण्यात येत आहे की, पुढील सभेमध्ये संपूर्ण माहिती देण्यात यावी. तोपर्यंत विषय तहकूब करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२१८ विषय क्रमांक – ७

दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –लेखा

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/३/कावि/१२३/२०१७ दि.२१/३/२०१७

विषय – पीएमपीएमएल संस्थेस पासेसपोटी अदा करावयाचे रकमेस मान्यता देणेबाबत....

विषय क्रमांक ७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय-** पीएमपीएमएलचे उपस्थित अधिकारी यांना मागील सभेमध्ये कोणाकोणाला किती पास दिले आहेत याची यादी सादर करणेबाबत सांगितले होते. म्हणून विषय तहकूब केला होता. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे किती कर्मचारी पास घेतात, कोणाच्या शिफारशीने घेतात, आमच्याकडून कोणाची पत्रे येतात, किती पास दिले जातात, याची सगळी माहिती पुढील सभेस येताना यादीसह आणावी. तोपर्यंत विषय तहकूब करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२१९ विषय क्रमांक – ८

दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – उदयान

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/७२/२०१७ दि.०९/०१/२०१७

विषय - इ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत उद्याने सुशोभिकरणासाठी रोपे खरेदी व नुतणीकरण करणेबाबत...

विषय क्रमांक ८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२२० विषय क्रमांक – ९

दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ.मु.का./४/कावि/१२१/२०१७ दि.३/४/२०१७

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ,ब,क,ड,इ,फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते/गटर्स साफसफाईकामी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था/बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्था/मजूर सहकारी संस्था यांचेकडून खाजगीकरणाद्वारे किमान वेतन दराने उपलब्ध केलेल्या कामगारांचे कामास मुदतवाढ देणेबाबत...

विषय क्रमांक ९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय-** गरीब, कष्टकरी यांना त्यांच्या कामाचा मोबदला मिळाला पाहीजे. पेरेंट कंपनी म्हणून आपण त्यांच्या हिताचे रक्षण केले पाहिजे. कामगारांचे ईएसआय/पीएफसंदर्भातील माहिती सभागृहाला दिलेली नाही. हा विषय तहकूब करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२२१ विषय क्रमांक – १०

दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ.मु.का./३/कावि/६७/२०१७ दि.३/३/२०१७

विषय –पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ३६ पैकी नजीकचे ०२ स्मशानभूमी/ दफनभूमीसाठी ठेकेदार पद्धतीने २४ तासासाठी ०७ काळजीवाहक प्रती दिन पुरविणेबाबत...

विषय क्रमांक १०चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२२२ विषय क्रमांक – ११

दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्यकीय)

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.आरोग्य वैद्य.अधिकारी यांचे जावक क्र.मसाभां/१/कावि/८७/२०१७ दि.२०/२/२०१७

मा.आरोग्य वैद्य.अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे वाय.सी.एम. रुग्णालयातील ओ.टी. विभागाकरिता आवश्यक असणारे शॅडोलेस लॅम्प खरेदीकामी प्रसिध्द करणेत आलेल्या ई- निविदेप्रमाणे मे.Shree Hospital Equipments या कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.प्राईम सर्जिकल ऍण्ड फार्मास्युटीकल यांनी सादर केलेले लघुत्तम र.रू.२,३८,७५०/- नुसार ३ नग खरेदीकामी र.रु.७,१६,२५०/- साठी करारनामा करुन व अनामत रक्कम घेऊन येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २२३ विषय क्रमांक – १२

दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्यकीय)

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.आरोग्य वैद्य.अधिकारी यांचे जावक क्र.मसाभां/१/कावि/८६/२०१७ दि.२०/२/२०१७

मा.आरोग्य वैद्य.अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

नविन भोसरी रुग्णालयाकरिता आवश्यक X-ray View Box खरेदीकामी प्रसिध्द करणेत आलेल्या ई- निविदेप्रमाणे मे. Sarita Surgical Works या कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. ओम एन्टरप्रायजेस यांनी सादर केलेले X-ray View Box लघुत्तम दर प्रती नग ४४००/- एकुण १५ नग साठी करारनामा करुन व अनामत रक्कम घेऊन येणारे र.रु.६६०००/- (अक्षरी र.रू.सहासष्ठ हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२२४ | विषय क्रमांक – १३
दिनांक – १९/०४/२०१७ | विभाग –माहिती व तंत्रज्ञान
सूचक – मा.अनुराधा गोफणे | अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/१२/कावि/४७/१७ दि.२२/०२/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्मार्ट सिटी प्रकल्पाकरीता Smart City Proposal तयार करणेकरीता केंद्र शासनाकडून shortlist करणेत आलेल्या यादीतील प्राप्त RFP नुसार मे. Crisil Risk and Infrastructure Solution Limited यांच्या लघुत्तम दरा नुसार र.रु.५५,००,०००/- + सेवा कर र.रु.८,२५,०००/- (किंवा GST लागू झालेस प्रत्यक्ष येणारी रक्कम) एकूण र.रु.६३,२५,०००/- दर स्विकृतीस आणि खर्चास व त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय-** सर्व विभागप्रमुखांना स्थायी समितीचे आदेश आहेत की, यापुढे ज्या वर्कऑर्डर दिल्या जातील, त्याच्या टेंडरच्या फॉर्ममध्ये ही अट टाकावी की, काम हे कालमर्यादीत (टाईमबाऊंड) असले पाहिजे. दर्जेदार झाले पाहिजे. ठेकेदाराने दिलेले काम वेळेआधी पूर्ण केल्यास बक्षिस दिले जाईल आणि वेळेनंतर केल्यास तो दंडास पात्र राहील. करारनामा करताना त्यात अट टाकावी, जेणेकरुन काम करणे सोप्पे होईल. सर्वांना बंधनकारक करा की, त्यांनी वेळेच्या आतमध्ये काम संपवले पाहिजे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२२५ | विषय क्रमांक – १४
दिनांक – १९/०४/२०१७ | विभाग –मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे | अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/१/कावि/९४/२०१६ दि.७/१२/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका विविध विभागामार्फत निविदा प्रसिध्द केल्या जातात. निविदा संचाची किंमती/दर याबाबत महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ दि.३० ऑक्टोबर २०१५ चे परिपत्रकातील ६.८ परिशिष्ठ ८ नुसार निविदेची किंमत/शुल्क वाढ केली आहे. त्यानुसार भांडार विभागाने सर्व विभागांची एकाच प्रकारचे निविदा संच दराबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.१५८५७ दि.२९.३.२०१६ अन्वये मान्यता घेऊन इकडील विभागाचे आदेश क्र.मभां/१/कावि/२९/२०१६ दि.१२.४.२०१६ अन्वये दरवाढ लागू करण्यात आलेली होती ती खालील प्रमाणे.

प्रपत्र 'क'

| अ. क्र | तपशिल (कामाची एकूण रक्कम) | दि.३०.१०.२०१५ चे शासन निर्णयानुसार दर | दि.१७.१०.१३ चे आदेशाप्रमाणे यापुर्वीचे निविदा संच दर | दि.१२.४.१६ आदेशाप्रमाणे निविदा संच विक्री दर | दि.१२.४.१६ आदेशाप्रमाणे प्रस्तावित वार्षिक दरवाढ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | र.रु. ५० हजाराचे आतील कामासाठी | -- | २००/- | ५००/- | -- |
| 2 | र.रु.५० हजार ते १ लाखापर्यंत | -- | ३००/- | ७००/- | -- |
| 3 | र.रु. १ लाख ते २ लाखापर्यंत | -- | ५००/- | १०००/- | -- |
| 4 | र.रु. २ लाख ते ५ लाखापर्यंत | १०००/-Yearly increase 100/- | ७५०/- | १५००/- | १००/- |
| 5 | र.रु. ५ लाख ते १० लाखापर्यंत | २०००/- Yearly increase 200/- | १,०००/- | २,०००/- | २००/- |
| 6 | र.रु. १० लाख ते ५० लाखपर्यंत | ३०००/- Yearly increase 300/- | १,५००/- | ३,०००/- | ३००/- |
| 7 | र.रु. ५० लाख ते १ कोटीपर्यंत | १०,०००/- Yearly increase 1000/- | २,०००/- | १०,०००/- | १०००/- |
| 8 | र.रु. १ कोटी ते २ कोटी | Respective Department to fix form fee | ३,०००/- | १३,०००/- | २०००/- |
| 9 | र.रु. २ कोटी ते ५ कोटी | Respective Department to fix form fee | १०,०००/- | १५,०००/- | २०००/- |
| 10 | र.रु. १० कोटी ते ५० कोटी | Respective Department to fix form fee | १५,०००/- | २०,०००/- | २०००/- |
| 11 | र.रु. १० कोटी ते ५० कोटी | Respective Department to fix form fee | २५,०००/- | ३०,०००/- | २०००/- |
| 12 | र.रु. ५० कोटी पेक्षा जास्त | Respective Department to fix form fee | ५०,०००/- | ५५,०००/- | २०००/- |

वरील प्रमाणे मान्य झालेल्या ठरावाला मा.स्थायी समिती ठराव क्र.१६२५६ दि.१७.५.२०१६ अन्वये "शासन निर्णय दि.३० ऑक्टोबर २०१५ नुसार वरील ठराव भांडार विभागामार्फत साहित्य खरेदीसाठी असून तो विकास कामाच्या निविदांना लागू न करता विकास कामाच्या निविदांना फॉर्म फी ही पुर्वीच्याच दरानेलागु करणेस मान्यता देणेत येत आहे" असा मा.सदस्य पारीत ठराव संमत झालेला आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.१५८१७ दि.२९.३.२०१६ प्रमाणे तसेच इकडील विभागाचे आदेश क्र.मभा/१/कावि/२९/२०१६ दि. १२.४.२०१६ निर्गत करणेत आलेले आहे. आदेश निर्गत केलेनंतर वरील ठरावामध्ये दुरुस्ती करणेसाठी मा.सदस्य ठराव झालेला आहे. मा.सदस्य ठराव क्र. १६२५६ दि.११.५.२०१६ प्रमाणे जर अंमलबजावणी

करावयाची असल्याने त्यास मा.मुलेप विभागामार्फत दिलेल्या अभिप्रायाप्रमाणे पुन्हा मा.स्थायी समितीची मंजुरी घ्यावी लागेल आदेश क्र.मभा/१/कावि/२९/२०१६ दि. १२.४.२०१६ हा आदेश रद्द करून नव्याने आदेश निर्गत करणे आवश्यक आहे.

प्रपत्र ' ब' ( विकास कामासाठी)

| अ.क्र | तपशिल (कामाची एकूण रक्कम) | दि.१७.१०.१३ चे आदेशा प्रमाणे निविदा संच विक्री दर | प्रस्तावित वार्षिक दरवाढ (प्रती वर्षी १०% प्रमाणे) दि.१.४.२०१७ पासुन लागु | सन २०१६-१७ करिता दरवाढ |
|---|---|---|---|---|
| १ | र.रु. ५० हजाराचे आतील कामासाठी | २००/- | -- | -- |
| २ | र.रु. ५० हजार ते १ लाखापर्यंत | ३००/- | -- | -- |
| ३ | र.रु. १ लाख ते २ लाखापर्यंत | ५००/- | -- | -- |
| ४ | र.रु. २ लाख ते ५ लाखापर्यंत | ७५०/- | Yearly increase 10% | १००/- |
| ५ | र.रु. ५ लाख ते १० लाखापर्यंत | १,०००/- | Yearly increase 10% | १००/- |
| ६ | र.रु. १० लाख ते ५० लाखपर्यंत | १,५००/- | Yearly increase 10% | १००/- |
| ७ | र.रु. ५० लाख ते १ कोटीपर्यंत | २,०००/- | Yearly increase 10% | १००/- |
| ८ | र.रु. १ कोटी ते २ कोटी | ३,०००/- | Yearly increase 10% | १००/- |
| ९ | र.रु. २ कोटी ते ५ कोटी | १०,०००/- | Yearly increase 10% | १००/- |
| १० | र.रु. ५ कोटी ते १० कोटी | १५,०००/- | Yearly increase 10% | १००/- |
| ११ | र.रु. १० कोटी ते ५० कोटी | २५,०००/- | Yearly increase 10% | १००/- |
| १२ | र.रु. ५० कोटी पेक्षा जास्त | ५०,०००/- | Yearly increase 10% | १००/- |

प्रपत्र 'ड' (सर्व विभांगाची साहित्य खरेदी)

| अ.क्र | तपशिल (कामाची एकूण रक्कम) | दि.३०.१०.२०१५ चे शासन निर्णयानुसार दर | दि.१७.१०.१३ चे आदेशाप्रमाणे यापुर्वीचे निविदा संच दर | प्रस्तावीत करावयाचे निविदा संच दर | प्रस्तावित वार्षिक दरवाढ |
|---|---|---|---|---|---|
| १ | र.रु. ५० हजाराचे आतील कामासाठी | -- | २००/- | ५००/- | -- |
| २ | र.रु. ५० हजार ते १ लाखापर्यंत | -- | ३००/- | ७००/- | -- |
| ३ | र.रु. १ लाख ते २ लाखापर्यंत | -- | ५००/- | १०००/- | -- |
| ४ | र.रु. २ लाख ते ५ लाखापर्यंत | १०००/- Yearly increase 100/- | ७५०/- | १५००/- | १००/- |
| ५ | र.रु. ५ लाख ते १० | २०००/- Yearly | १,०००/- | २,०००/- | २००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | लाखापर्यंत | increase 200/- | | | |
| ६ | र.रु. १० लाख ते ५० लाखपर्यंत | ३०००/- Yearly increase 300/- | १,५००/- | ३,०००/- | ३००/- |
| ७ | र.रु. ५० लाख ते १ कोटीपर्यंत | १०,०००/- Yearly increase 1000/- | २,०००/- | १०,०००/- | १०००/- |
| ८ | र.रु. १ कोटी ते २ कोटी | Respective Department to fix form fee | ३,०००/- | १३,०००/- | २०००/- |
| ९ | र.रु. २ कोटी ते ५ कोटी | Respective Department to fix form fee | १०,०००/- | १५,०००/- | २०००/- |
| १० | र.रु. ५ कोटी ते १० कोटी | Respective Department to fix form fee | १५,०००/- | २०,०००/- | २०००/- |
| ११ | र.रु. १० कोटी ते ५० कोटी | Respective Department to fix form fee | २५,०००/- | ३०,०००/- | २०००/- |
| १२ | र.रु. ५० कोटी पेक्षा जास्त | Respective Department to fix form fee | ५०,०००/- | ५५,०००/- | २०००/- |

वरीलप्रमाणे को-या निविदा संच विक्री व वार्षिक दरवाढ प्रपत्र 'ब' (विकास कामासाठी) व प्रपत्र 'ड' (सर्व विभांगाची साहित्य खरेदी) प्रमाणे करणेत आलेली असल्याने सदर दरवाढीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२२६ विषय क्रमांक – १५

दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –आरोग्य मुख्य कार्यालय

सुचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/८२९/२०१६ दि.१६/१२/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "ड" क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा.चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणेचे कामासाठी उपलब्ध वाहनांवर ४७ वाहन चालक, ३ सुपरवायझर व ९४ कामगार पुरविणेकामी ई-निविदा नोटीस क्र. ५/२०१४-१५ प्रसिध्द करुन १ वर्ष कालावधीकरीता निविदा मागविणेत आल्या होत्या. सदरची निविदा किमान वेतन दराच्या असुन यामध्ये अंदाजपत्रक तयार करताना कामगारांचे वेतन व भत्ते यापोटी देय असणारी रक्कम ९०% असुन निविदाधारकांना सेवाशुल्क म्हणून १०% असे रकमेचे विभाजन करणेत आले होते. यामध्ये कामगारांचे वेतन व भत्ते र.रु.१,६९,४६,६१२/-+ सेवाशुल्क र.रु.१६,९४,६६१/- अशी एकूण र.रु.१,८६,४१,२७३/- एवढी निविदेची अंदाजपत्रकीय किंमत आहे. निविदेसाठी सेवाशुल्क रकमेवर पात्रता हा निकष ठेवणेत आला होता. त्यानुसार मे.सावित्री महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांनी सेवाशुल्काच्या ८१.५०% कमी दराने (र.रु.३,१३,५१०/-) व एकूण निविदा रकमेच्या ७.४१% कमी दराने निविदा सादर

केली होती. सदरचे दर लघुत्तम असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "ड" क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणे या कामासाठी निविदेमध्ये नमूद केलेप्रमाणे कामगार उपलब्ध करणे तसेच अन्य वाहनांसाठी ७ वाहन चालक पुरविणेकामी दिनांक २३/०७/२०१६ अखेर ठेकेदार म्हणून नेमणूक करणेत आली होती. तदनंतर दि.२४/७/२०१६ ते दि.३१/१२/२०१६ पर्यंत मुदतवाढ देणेस मा.स्थायी समिती ठराव क्रं.१७१०५ दिनांक ६/९/२०१६ अन्वये मान्यता मिळाली आहे. सदर कामाची मुदत दि.२/१/२०१७ अखेर संपुष्टात येणार आहे. सध्या संस्थेमार्फत ५६ वाहनचालक, ६ सुपरवायजर व ९४ कामगार उपलब्ध करुन कामकाज सुरु आहे. याकामाची नविन निविदा कार्यवाही सुरु करणेत आली आहे. त्यास काही महिने कालावधी लागणार आहे. त्यामुळे मे. सावित्री महिला स्वंयरोजगार सेवा सह. संस्था मर्या. यांची ठेकेदार म्हणून दिनांक ३/१/२०१७ ते दिनांक ३०/०४/२०१७ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत या पैकी जे प्रथम पुर्ण होईल त्या कालावधीपर्यंत नेमणूक करणेस मुदतवाढ देणे व याकामी येणा-या अंदाजे र.रु.७०,७७,४००/- (अक्षरी र.रु.सत्तर लाख सत्याहत्तर हजार चारशे फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय-** मा.बोदडे (सहा.आयुक्त) यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील पवना, मूळा आणि इंद्रायणी या तीनही नद्यांमधील हायसिंथ काढून घ्यावे. सध्याची परिस्थिती सांगावी. निविदांच्या जाहिराती लिडींग वर्तमानपत्रांतच देण्यात याव्यात. जास्तीत जास्त निविदा धारक आले पाहिजेत. पुणे महानगरपालिका व मुंबई महानगरपालिका येथे जाहीरात धोरण काय आहे ते पुढील सभेमध्ये आणून दाखवावे.

विषय क्रमांक १५ साठी केवळ २ महिन्यांची मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात येत आहे. जूलै महिन्यांनंतर विषयपत्रिकेवर मुदतवाढीचा एकही विषय येता कामा नये. शॉर्ट टेंडर नोटीस करा. स्थायी समितीकडून दोन महिन्यांनंतर मुदतवाढीच्या विषयांना मान्यता देण्यात येणार नाही. मा.आयुक्त साहेब यांनी या संदर्भातील धोरण पुढील सभेमध्ये आणावे. मा.नगरसचिव यांनी स्थायी समितीमध्ये जी धोरणे सांगतो, त्या धोरणांवर मा.सभापती यांच्या सह्या घेऊन त्या त्या विभागांना त्याची प्रत द्यावी. स्थायी समितीने जे जे आदेश दिले आहेत, त्यानुसार सर्व विभागांनी काम करणे अपेक्षित आहे. विशेष करुन आरोग्य विभाग तसेच सर्व विभागप्रमुखांनी आत्ताच चालू कामांची छाननी सुरु करावी. यापुढे मुदतवाढीचे विषय आल्यास अधिका-यांना बिलाचे पैसे द्यावे लागतील.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२२७ विषय क्रमांक – १६

दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/७/कावि/९५४/२०१६ दि.२/१/२०१७

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आरोग्य विभागास आवश्यक ४.५ घन मिटर क्षमता बीन्स कंटेनर म.न.पा.ड्रॉईंग/डिझाईन/स्पेशिफिकेशन/नमुन्या प्रमाणे खरेदीबाबत...

विषय क्रमांक १६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २२८ विषय क्रमांक – १७
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –उद्यान
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/१३/२०१७ दि.१०/१/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.19/2016-17 करीता मनपाचे दुर्गादेवी उदयान येथे एफ.आर.पी. टॉयलेट ब्लॉक पूरविणे व बसविणेकामी मे.अव्वल फायबर ग्लास कोटेशन नोटीस र.रू.1,98,000/- (अक्षरी.र.रू.एक लाख अठ्ठ्याण्णव हजार फक्त) पेक्षा -34% ने कमी कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश,उदयान/4/कावि/09/2017 दि.09/01/2017 अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२२९ विषय क्रमांक – १८
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – उद्यान
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/१४/२०१७ दि.१०/१/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.14/2016-17 करीता मनपाचे दुर्गादेवी उदयान येथे एफ.आर.पी. टॉयलेट ब्लॉक पूरविणे व बसविणेकामी मे.अव्वल फायबर ग्लास कोटेशन नोटीस र.रू.1,98,000/- (अक्षरी र.रू.एक लाख अठ्ठ्याण्णव हजार फक्त) पेक्षा -34% ने कमी कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/4/कावि/10/2017 दि.09/01/2017 अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २३० विषय क्रमांक – १९
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – माहिती व जनसंपर्क
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/३/कावि/९/२०१७ दि.११/१/२०१७
विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक फेब्रुवारी २०१७ मतदार जनजागृतीचे कार्यक्रमासाठी येणा-या खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणेबाबत...

विषय क्रमांक १९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –२३१ विषय क्रमांक – २०
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – नगररचना व विकास
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/०५/कावि/३९/२०१७ दि.७/३/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रस्तावात नमूद प्रमाणे अमृत योजना या लेखाशिर्षाकरीता सन २०१६-१७ चे मुळ अंदाजपत्रकात र.रू.४० कोटी तरतूद केलेली असून माहिती व तंत्रज्ञान विभागाने २०१६-१७ चे सुधारीत अंदाजपत्रक र.र.२४ कोटी ३५ लाख रकमेचे लेखा विभागाकडे सादर केलेले आहे. सबब र.रू.४० कोटी मधील र.रू.१५ कोटी तसेच सन २०१६-१७ चे मुळ अंदाजपत्रकात कर्ज निवारण निधी या लेखाशिर्षावर र.रू.५ कोटी तरतूद केलेली असून त्यातून र.र.३ कोटी ५० लाख वर्ग करून अशा प्रकारे एकूण ४५ कोटी रूपये नगररचना विभागाकडे भूसंपादन निधी या लेखाशिर्षावर वर्ग करण्यात आलेले आहेत. मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक लेखा/०६/कावि/२७२३/२०१७ दिनांक २४/१/२०१७ अन्वये सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात र.रू.४५,००,००,०००/- (अक्षरी र.रू. पंचेचाळीस कोटी फक्त) नगररचना व विकास विभागाकडील "भूसंपादन निधी" या लेखाशिर्षावर वर्ग करणेत आलेले असल्याने रकमेविषयीचे प्रतिवृत्त अवलोकन करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२३२ विषय क्रमांक – २१
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –लेखा
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/२२/कावि/१२/२०१७ दि.१०/०३/२०१७
विषय - वृक्ष प्राधिकरणाचे सन २०१६-२०१७ चे सुधारीत व सन २०१७-२०१८ चे मूळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक २१चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय-** विषयाशी संबंधित अधिकारी सभेस उपस्थित नसल्यामुळे विषय पुढील सभेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२३३ विषय क्रमांक – २२
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –मध्यवर्ती साहित्य भांडार,वैद्यकीय
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/५/कावि/१७६/२०१७ दि.१०/०३/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या इमारतीमधील कॉरीडॉर, अंतर्गत व बाहय परिसराची दैनंदिन साफसफाई व स्वच्छता हे काम मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., यांचेकडुन (सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने) त्यांची स्वत:ची अत्याधुनिक

उपकरणे, रसायने व मनुष्यबळाचा वापर करुन तांत्रिक पध्दतीने (Mechanized Cleaning) साफसफाई व स्वच्छता करुन घेणेकामी नविन ई-निविदेची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत झालेल्या करारनाम्यास अधिन राहून मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. यांचेकडून करुन घेणेकामी अंदाजे चार ते पाच महिने किंवा नविन ई-निविदेची कार्यवाही पुर्ण होईपर्यत किमान वेतन कायदा दराप्रमाणे मनुष्यबळाचे दर ग्राहय धरुन व इतर कोणतीही वाढ न देता म्हणजेच आवश्यक लागणारी उपकरणे, रसायने व तत्सम् बाबींसाठी लागणा़ऱ्या खर्चामध्ये वाढ न करता करुन घेणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय-**रुग्णालयाशी संबंधित विषय असल्यामुळे जूलै महिन्यापर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २३४ विषय क्रमांक – २३

दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/७/कावि/२५८/२०१७ दि.१०/३/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे आरोग्य विभागास ई.निविदा सुचना क्रमांक.४८/२०१६-१७ अन्वये प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.रमेश अग्रोकेम कॉर्पो. यांचे १५०० लि. सायफ्ल्युथ्रीन ५% EW चे एकूण दर र.रू.२९,१०,०००/- हे मनपा अंदाजपत्रकीय दर र.रू.२९,२५,०००/- पेक्षा ०.५१% ने कमी असल्याने ते स्विकृत करून पुरवठा आदेश निर्गत करणेकामी त्यांचेबरोबर करारनामा करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २३५ विषय क्रमांक – २४

दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/१०/कावि/१०६/२०१७ दि.१४/३/२०१७

विषय- सार्वत्रिक निवडणूक 2017 करीता मनपाच्या विद्युत विभागासाठी विविध प्रकारचे विद्युत साहित्य खरेदीबाबत...

विषय क्रमांक २४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २३६ विषय क्रमांक – २५

दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/८/कावि/१६६/२०१७ दि.१४/३/२०१७

विषय - सार्वत्रिक निवडणूक 2017 करीता आवश्यक छपाई साहित्य खरेदीबाबत...

विषय क्रमांक २५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –२३७ विषय क्रमांक – २६
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सुचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/क-मुख्य/२३/२०१७ दि.२४/३/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३१/१/२०१५-१६ अन्वये पिंपरी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात भिमसृष्टी तयार करणे (ब) मुरल्स बसविणेकामी मे.कला संस्कार आर्ट स्टुडीओ नि.र.रू.२,९७,७१,८४४/- (अक्षरी दोन कोटी सत्त्यान्नव लाख एक्काहत्तर हजार आठशे चव्वेचाळीस फक्त) पेक्षा ०.५०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.३,११,०४,१३४/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय-** मा.घुबे (कार्य.अभियंता) यांना सूचना करणेत येते आहे की, कामाचा दर्जा राखला गेला पाहीजे. या कामात एकही चूक झालेली चालणार नाही. या कामाचे सबलेटींग कोणाला करणार नाही, असे अंडरटेकींग/शपथपत्र कलासंस्कार आर्ट स्टुडिओ यांचेकडून घ्यावे. विठ्ठल-रखुमाई प्रकरणात ज्या व्यक्तीवर आरोप झाला, त्या व्यक्तीकडे हे काम गेल्यास त्यास आपण जबाबदार राहाल.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२३८ विषय क्रमांक – २७
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग–मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०८/कावि/२५०/२०१७ दि.६/४/२०१७
विषय - मनपाचे करआकारणी व करसंकलन विभागास सन 2017-18 करिता आवश्यक मिळकत कर बिले छपाईबाबत...

विषय क्रमांक २७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२३९ विषय क्रमांक – २८
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०८/कावि/२२५/२०१७ दि.५/४/२०१७
विषय – पिंपरी चिंचवड सार्वत्रिक निवडणूक 2017 आवाहन पत्रके छपाई करुन मिळणेबाबत...

विषय क्रमांक २८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२४० विषय क्रमांक – २९
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – नागरवस्ती विकास योजना
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/४/कावि/११२/२०१७ दि.१०/४/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

नागरवस्ती विकास योजना विभागा अंतर्गत नि:समर्थ (अपंग) कल्याणकारी योजना क्र.६ अन्वये मनपा हद्दीतील अपंग व्यक्तिंना व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणेबाबत सन-२०१६-१७ मध्ये जाहिर प्रकटनानुसार अर्ज मागविले असुन प्राप्त अर्जापैकी प्रस्तावात नमूद एका लाभार्थिचे कर्ज प्रकरण बँकेने मंजुर केले आहे. त्यानुसार श्री.शिवहरी पांडुरंग गायकवाड या लाभार्थीस एकुण र.रू.१,०००००/-(Back end Subsidy) स्वरूपात अर्थसहाय्य देण्यास व त्याकरिता येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय-** मा.समाज विकास अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, एकत्रित विषय आणावेत. Back end Subsidy बाबत विभागप्रमुख यांनी काळजी घ्यावी. जर front end subsidy दिल्याचे आढळून आल्यास विभागप्रमुखांवर कारवाई करणेत येईल. मागासवर्गीय मुलांच्या शिष्यवृत्तीचे चेक देणेबाबतचा विषय पुढील सभेच्या कार्यपत्रिकेवर आणावा. नागरवस्ती विकास योजनांच्या कोणकोणत्या हेडवरील किती रक्कम खर्च झाली, त्याचा लेखाजोखा पुढील सभेस घेऊन यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२४१ विषय क्रमांक – ३०
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/१३१/२०१७ दि.१०/४/२०१७
विषय- प्रभाग क्र.7 च-होली वडमुखवाडी येथे नविन विकसीत होणा-या भागात ठिकठिकाणी पाईपलाईन टाकणेबाबत…

विषय क्रमांक ३०चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२४२ विषय क्रमांक – ३१
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/१३०/२०१७ दि.१०/४/२०१७
विषय- देहू रस्ता परिसरात वितरण नलिका टाकणेबाबत…

विषय क्रमांक ३१चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२४३ विषय क्रमांक – ३२
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्यकिय)
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे जावक क्र.मसाभां/१/कावि/१५६/२०१७ दि.१०/४/१७

मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

वाय.सी.एम.रुग्णालयाकरिता आवश्यक Bedside Locker 40 Nos खरेदी करणेकामी Fab-o-weld Engineers कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.ओम एन्टरप्रायजेस यांनी ई- निविदा सुचना क्र.११/२०१६-१७ करीता सादर केलेले लघुत्तम दर प्रती नग र.रु.३५००/-साठी त्यांचे समवेत दि.५/१०/२०१६ रोजी झालेल्या करारनाम्यास अधिन राहुन व अनामत रक्कम घेऊन येणारे र.रु.१,४०,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२४४ विषय क्रमांक – ३३
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – पशुवैद्यकिय
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पवै/१/कावि/२०/२०१७ दि.११/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रात पशुजन्म नियंत्रण कार्यक्रम राबविणेकामी उपलब्ध संस्था मे.सोसायटी फॉर ऍ़निमल प्रोटेक्शन, कोल्हापूर या संस्थेस यापुर्वी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीस अधिन राहुन पुर्वीचेच दराने म्हणजे र.रु.६४९ प्रति केस(नर/मादी) प्रमाणे नविन ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन संस्थेची नेमणुक होईपर्यंत मुदतवाढीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २४५ विषय क्रमांक – ३४
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – पशुवैद्यकिय
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पवै/१/कावि/१९/२०१७ दि.११/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रात पशुजन्म नियंत्रण कार्यक्रम राबविणेकामी उपलब्ध संस्था मे.पिपल फॉर ऍ़निमल, पुणे या संस्थेस यापुर्वी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीस अधिन राहुन पुर्वीचेच दराने म्हणजे र.रु.६४९ प्रति केस(नर/मादी) प्रमाणे नविन ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन संस्थेची नेमणुक होईपर्यंत मुदतवाढीस मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय-** डॉ.गोरे डिसेंबर महिन्यात सेवानिवृत्त होत असल्यामुळे तसेच महापालिकेत त्या पदाची दुसरी व्यक्ती उपलब्ध नसल्यामुळे प्रशासन विभागाने या पदाची जाहीरात आत्ताच प्रसिद्ध करावी. कुत्र्यांचे ऑपरेशन करताना त्याचा डिजिटल डाटा उपलब्ध असला पाहिजे. शहरातील कुत्र्यांची गणती करावी. शस्त्रक्रिया झालेल्या कुत्र्यांना बिल्ला लावावा. कुत्रे

पकडण्याबाबत तक्रार आल्यास त्याप्रमाणे त्या भागातून ती त्वरीत पकडली गेली पाहीजेत. विषय क्र.३३ आणि ३४ यातील २ संस्थांना दोन महिन्यांपर्यंत मुदतवाढ देणेत येत आहे. विभागप्रमुखांनी निविदा प्रसिद्धीची कार्यवाही चालू करावी. स्थायी समितीने दिलेल्या आदेशांवर ताबडतोब अंमलबजावणी सुरु करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२४६ विषय क्रमांक – ३५
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – स्थापत्य
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३इ/कावि/१७१/१७ दि.११/४/२०१७
विषय-च-होली ७ दाभाडेवस्ती ते च-होली गावठाण ३० मी डि.पी. रस्ता विकसित करणेबाबत...

विषय क्रमांक ३५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२४७ विषय क्रमांक – ३६
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय रुग्णवाहिका विभाग
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.रुग्ण/१/कावि/१५७८/२०१७ दि.५/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रूग्णवाहिका विभागातील कामाचा व्याप पहाता मागील 3 महीन्यात मानधनावर जे कर्मचारी (वाहनचालक) नेमलेले आहेत त्यांची मुदत दि.04/04/2017 रोजी संपुष्टात आलेली आहे. प्रस्तावात नमुद उमेदवारांना त्यांचे नावापुढे नमुद पदावर व नमुद मानधनावर 1 दिवस सेवा खंडीत करून त्यांना पुढील 1 महिना कालावधीसाठी मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२४८ विषय क्रमांक – ३७
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/७/कावि/५१९/२०१७ दि.३/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयातील कामाचा व्याप पाहता मागील ६ महिन्यात मानधनावर जे कर्मचारी नेमलेले आहेत. त्यांची मुदत दि.२९/०३/२०१७ रोजी संपुष्टात येत असल्याने प्रस्तावात नमुद केलेल्या पदांसाठी दर्शविलेप्रमाणे नियुक्त केलेले मानधनावरील स्टाफनर्स (ANM) यांना विशेष बाब म्हणून दि.०५/०४/२०१७ पासुन दि.०४/०५/२०१७ पर्यंत पुढे १ महिना कालावधीसाठी मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –२४९ विषय क्रमांक – ३८
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/७/काकवि/४३५/२०१७ दि.७/३/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये रजिस्ट्रार-१९ व हाऊसमन-५४ या पदांसाठी आलेल्या अर्जानुसार मुलाखत/लेखी परिक्षा घेवुन निवड समितीने शिफारस केलेप्रमाणे प्रस्तावा सोबत जोडलेल्या यादीमधील रजिस्ट्रार-८ व हाऊसमन-१३ यांना दि.०७/३/२०१७ ते दि.२/९/२०१७ पर्यंत सहा महिने (१८० दिवस) या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात एकत्रीत मानधनावर नेमणूक देणेत आली असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२५० विषय क्रमांक – ३९
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/७/कावि/४४२/२०१७ दि.१२/३/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामधील एकत्रित मानधनावर असलेले कर्मचारी यांची मुदत दि.०५/०३/२०१७ रोजी संपुष्टात येत असल्याने प्रस्तावातील प्रपत्र 'अ'मध्ये नमुद केलेल्या मानधनाप्रमाणे विविध-१४ पदांवरील कर्मचारी यांना विशेष बाब म्हणून दि.०६/०३/२०१७ रोजी १ दिवस सेवा खंडीत करुन दि.०७/०३/२०१७ पासुन दि.०६/०५/२०१७ पर्यंत पुढे २ महिना कालावधीसाठी मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२५१ विषय क्रमांक – ४०
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/७/कावि/४२९/२०१७ दि.७/३/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामधील एकत्रित मानधनावर १ महिन्यासाठी रजिस्ट्रार-९ व हाऊसमन-३३ या पदांना विशेष बाब म्हणून दि.०६/०२/२०१७ रोजी १ दिवस सेवा खंडीत करुन दि.०७/०२/२०१७ पासुन दि.०६/०३/२०१७ पर्यंत पुढे १ महिने कालावधीसाठी मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२५२ विषय क्रमांक – ४१
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/७/कावि/५१७/२०१७ दि.३/४/२०१७
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयातील कामाचा व्याप पाहता मागील ६ महिन्यात मानधनावर जे कर्मचारी नेमलेले आहेत. त्यांची मुदत दि.०३/०४/२०१७ रोजी संपुष्टात येत असल्याने प्रस्तावातील प्रपत्र 'अ'मध्ये नमुद केलेल्या पदांसाठी दर्शविलेप्रमाणे नियुक्त केलेले मानधनावरील स्टाफनर्स (GNM) यांना विशेष बाब म्हणून दि.०४/०४/२०१७ रोजी १ दिवस सेवा खंडीत करुन दि.०५/०४/२०१७ पासुन दि.०४/०५/२०१७ पर्यंत पुढे १ महिना कालावधीसाठी मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२५३ विषय क्रमांक – ४२
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग –यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/७/कावि/५२३/२०१७ दि.१०/४/२०१७
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयातील सद्या कार्यरत असलेले मानधनावरील विविध (नविन) पदांवर जे कर्मचारी नेमलेले आहेत. त्यांची मुदत दि.०७/०४/२०१७ रोजी संपुष्टात येत असल्याने वरील पदांना विशेष बाब म्हणून दि.०८/०४/२०१७ रोजी १ दिवस सेवा खंडीत करुन दि.०९/०४/२०१७ पासुन दि.०८/०५/२०१७ पर्यंत पुढे १ महिना मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५४ विषय क्रमांक – ४३
दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – माध्यमिक शिक्षण
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/०३/कावि/८१/२०१७ दि.७/४/२०१७
मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागातंर्गत १८ माध्यमिक विद्यालये कार्यरत आहेत. त्या विद्यालयातील इयत्ता ५ वी व ८ वी च्या विद्यार्थांना स्कॉलरशिप परिक्षेतील प्रत्यक्ष पेपर व त्यात विचारले जाणारे प्रश्न यांचा सराव होणेसाठी प्रश्नसंच खरेदी करणेसाठी कोटेशन नोटिस प्रसिध्द करुन दर पत्रके मागविणेत आली होती. त्यानुसार ३ कोटेशन प्राप्त झालेल्या कोटेशन मध्यें चैताली प्रकाशन पुणे यांचे दर १८०/- प्रति संच असुन

त्यावर १५% सवलत देऊन र.रु.१५३/- असा असुन तो सर्वात कमी दर प्राप्त झालेला आहे. त्यानुसार चैताली प्रकाशन यांनी सराव प्रश्नपत्रिका संचाचा पुरवठा केलेला आहे. इयत्ता ५ वी प्रेरणा आदर्श सराव प्रश्नपत्रिका (पेपर १ व २) ३६ संच प्रति दर र.रु.२४०/- प्रमाणे र.रु.८,६४० तसेच इयत्ता ८ वी प्रेरणा आदर्श सराव प्रश्नपत्रिका (पेपर १ व २) ४३० संच प्रति दर र.रु.१८०/- प्रमाणे र.रु.७७,४००/- असे एकुण ८६,०४०/- मधुन र.रु.१५% सवलत र.रु.१२,९०६/- वजा जाता र.रु.७३,१३४/- च्या बिलाची मागणी चैताली प्रकाशन यांनी दिनांक ३/३/२०१७ अन्वये केलेली आहे. तरी माध्यमिक विद्यालयांचा विचार करता र.रु.७३,१३४/- खर्च झालेला आहे. चैताली प्रकाशन यांना बील अदा करावयाचे असल्याने सदरच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –२५५ विषय क्रमांक – ४४

दिनांक – १९/०४/२०१७ विभाग – माध्यमिक शिक्षण

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/३६९/१७ दि.७/४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

माध्यमिक शिक्षण विभागाकडील स्कॉलरशिप पुस्तकांचे मागणीनुसार महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ बालभारती पुणे यांनी इ.५ वी व ८ वी च्या एकुण ११७ संचाकरीता दिनांक ७/१०/१६ रोजीचे आगाऊ देयक क्र.२१६०००७ अन्वये रक्कम रु.३६,३१८/- मधुन वजा वटाव र.रु.५,४४८/- वजा जाता र.रु.३०,८७०/-(अक्षरी र.रु.तीस हजार आठशे सत्तर फक्त) आगाऊ मागणी केली होती. त्यानुसार मा.आयुक्त यांचेकडील आ.क्र.माध्य/शि/३/कावि/२९५/१६ दिनांक ४/११/१६ अन्वये र.रु.३०,८७०/- (अक्षरी र.रु.तीस हजार आठशे सत्तर फक्त) मा.संचालक पाठ्यपुस्तक मंडळ पुणे-४ यांना आगाऊ अदा करणेत आली होती. त्याप्रमाणे महानगरपालिकेच्या १७ माध्यमिक विद्यालयास सन २०१६-१७ मध्यें स्कॉलरशिप पुस्तकांचे वाटप करणेत आले असुन पुस्तके मिळालेबाबतची पोहोच घेणेत आली असल्याने स्कॉलरशीप पुस्तके खरेदीकामी झालेला प्रत्यक्ष खर्च र.रु.३०,८७०/- च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/३३/२०१७
दिनांक - २७/०४/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.